ISSN 2229-6190
RNI. MAHMUL02937/2010/35848

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Scanned with CamScanner

RNI. MAHMUL02937/2010/35848

SOCIAL GROWTH

IMPACT FACTOR -6.10

ISSN 2229-6190

Issue : XXIII, Vol. I, Nov. 2021 To April 2022

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Performance Evaluation of Bhausaheb Fundkar Scheme in Mangaon Taluka<br>**Dhairyashil B. Khamkar** | 1 |
| 2 | Growth of Co-operative Sugar Industry<br>**Dr. B. R. Kundgir** | 9 |
| 3 | A Case Study of Historical Tourist Places in Vidarbha region of Maharashtra<br>**Dr. N. T. Wankhade** | 20 |
| 4 | Comparative Study of Motor Abilities of Handball and Hockey Players<br>**Dr. Sanjay V. Deshmukh** | 33 |
| 5 | लोककला 'दशावतार : एक अभ्यास<br>**डॉ. चंद्रशेखर कणसे** | 39 |
| 6 | आरोग्यातील अर्थसंकल्पीय तरतूद : एक अभ्यास<br>**डॉ. रमेश वाघमारे** | 44 |
| 7 | महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना : एक आकलन<br>**डॉ. शंकर लेखणे** | 51 |
| 8 | महाराष्ट्रातील दलित वस्ती एक अवलोकन<br>**नंदकूमार रामचंद्र कोल्हापूरे** | 56 |


Scanned with CamScanner

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 6.10
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XXIII, Vol. I, Nov. 2021 To April 2022 

7

# महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना : एक आकलन

**डॉ. शंकर लेखणे**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शंकरनगर, जि. नांदेड

*Research Paper - P. A.*

## प्रस्तावना

महात्मा गांधी हे स्वातंत्र्यलढ्यतील भारतीय राजकारणाचे प्रमुख शिल्पकार व सूत्रधार म्हणून दीर्घकाळ वावरलेले होते. तत्कालीन भारतीयलोकांवर त्यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता, त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कृती—उक्ती त्याचबरोबर सत्याग्रह व सामाजिक सुधारणेसाठी केलेल्या आंदोलनाची प्रतिबिंबे राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात उमटलेली दिसून येतात.गांधीवाद किंवागांधी विचार हा जीवनव्यापी आहे. त्यामुळे त्यांना देश काल प्रांत भाषा या मर्यादा दिसून येत नाहीत. त्यामुळेच आजच्या काळातही गांधीजींचे विचार व त्यांनी मांडलेल्या संकल्पना प्रासंगिक व मार्गदर्शक आहेत.

गांधीवादाचे जे चार प्रमुख पैलू आहेत ते म्हणजे सत्य, अहिंसा, स्वावलंबन आणि विश्वस्त (Trusteeship) हे चार पैलू अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. या चारही तत्त्वांचा अवलंब गांधीजींनी आपल्या आचरणातून वर्तनातून केला आणि ते सिद्ध झाल्यानंतरच त्या तत्त्वांना त्यांनी सैद्धांतिक रूप दिले व त्यांना सार्वजनिक केले. गांधीजींचे विचार मानवतावादावर व नैतिक मूल्यांवर आधारलेले आहेत. त्यांनी मांडलेली विश्वस्त संकल्पनाही याच मूल्यांवर भर देणारी आहे.

## संशोधन लेखाचा उद्देश

प्रस्तुत संशोधन लेखाचा मुख्य उद्देश महात्मा गांधीयांची विश्वस्त संकल्पना समजून घेण्याचा आहे.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन लेख वर्णनात्मक पध्दतीने लिहिला असून त्यासाठी आवश्यक असलेली माहिती तथ्य संकलनाच्या दुय्यम साधनांचा अवलंब करून प्राप्त केली आहे,

Scanned with CamScanner

ज्यामध्ये विषयाशी संबंधित ग्रंथ व विश्वकोशाचा समावेश आहे.

**विश्वस्त संकल्पनेचा उदय**

मराठी विश्वकोशानुसार विश्वस्त संकल्पनेचा उगम प्युरिटन धर्म मतांमध्ये दिसून येत असला तरी विश्वस्त ही संकल्पना गांधीजींच्या आर्थिक विचारातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना मानली जाते. या विचारांची प्रेरणा त्यांना इशोपनिषदातील मंत्रातून मिळालेली दिसून येते. गांधीजींनी विश्वस्त संकल्पनेचा विचार दक्षिण आफ्रिकेत १९०३ साली केला वपुढे १९०९ साली हिंदस्वराजया आपल्या पुस्तकात त्यांनी हा विचार मांडला आणि १९१६ साली बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी देशातील संस्थानिकांना उद्देशून त्यांनी विश्वस्तांच्या भूमिकेतून आपल्या संपत्तीचा विनियोग लोककल्याणासाठी करावा असे आवाहन केले, याचाच अर्थ गांधीजींनी १९१६ मध्ये सर्वप्रथम आपल्या भाषणांमध्ये जाहीरपणे विश्वस्त संकल्पना मांडलेली दिसून येते.

**विश्वस्त संकल्पनेचा अर्थ वआशय**

विश्वस्तवृत्ती ही माणसाच्या मूलभूत चांगुलपणावर व सतप्रवृत्तीवर भर देणारी नैतिक संकल्पना असून प्युरिटन धर्म मतानुसार जगातील सर्व वस्तूंवर अखेर परमेश्वराची सत्ता आहे; माणसाला त्याने फक्त उपजीविकेचा अधिकार दिला आहे,अशी ती धारणा होती.महात्मा गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेनुसार,'श्रीमंतांनी त्यांच्याकडील संपत्तीचे विश्वस्त व्हावे, स्वामी होऊ नये. याचा अर्थ श्रीमंतांनी आपली संपत्ती मालमत्ता लोकहितार्थ वापरावी. केवळ स्वतःच्या उपभोगासाठी वापरू नये. माणसाने आपल्या गरजा किमान ठेवाव्यात, सन्मानाने जगण्यासाठी लागणाऱ्या संपत्तीपेक्षा जेवढी जास्त संपत्ती असेल त्यावर श्रीमंतानी हक्क सांगू नये. त्या संपत्तीवर समाजाची मालकी असावी व ती समाजाच्या कल्याणासाठी वापरली जावी. श्रीमंतांनी त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून कार्य करावे, असे तत्त्वज्ञान गांधीजींनी विश्वस्त संकल्पनेत मांडलेले आहे.

**विश्वस्त संकल्पनेतीलतत्वे**

महात्मा गांधींनी मांडलेल्या विश्वस्त संकल्पनेचे स्वरूप समजून घेत असताना या संकल्पनेच्या अंतरंगात पुढील तत्त्वे अंतर्भूत असल्याचे दिसूनयेते.

**१) आर्थिक समता निर्मितीचे तत्व**

समाजातील अनेक प्रश्न हे आर्थिक विषमतेतून निर्माण होतात, त्यामुळे आर्थिक समता निर्माण करून एक आदर्श व चांगला समाज निर्माण होऊ शकतो. परंतु ही आर्थिक समता हिंसक मार्गाचा अवलंब न करता मानवता वादाने आणि नैतिक

Scanned with CamScanner

मूल्याने निर्माण करण्यासाठी विश्वस्त संकल्पना उपयुक्त व महत्त्वाची ठरते.

**२) शोषण मुक्तीचे तत्व**

विश्वस्त संकल्पनेत गांधीजी उपभोगा ऐवजी उपयोगाला महत्त्व देतात. प्रत्येकाने आपल्याकडील संपत्तीचा उपभोग घेण्याऐवजी गरजेनुसार उपयोग करावा, ज्यामुळे समाजातील खऱ्या गरजू लोकांच्या गरजा भागू शकतील. गरजेपेक्षा आपण जास्त घेतो तेव्हा ते एक प्रकारे शोषण होते.भोग घेण्याची वृत्ती ही शोषणाला साहाय्यभूत ठरते त्यामुळे वस्तूंचा, संपत्तीचा उपयोग गरजेनुसार झाला तर शोषणमुक्त समाज निर्माण होण्यासाठी ही संकल्पना उपयुक्त ठरते.

**३) समाजवादी समाज निर्मितीचेतत्व**

समाजामध्ये संपत्तीचे केंद्रीकरण झालेआणि भांडवलशाही निर्माण झाली तर गरीब श्रीमंत यांच्यातील अंतर वाढेल, वर्गसंघर्ष वाढेल, बेरोजगारीत वाढ होईल आणि मग रक्तरंजित क्रांतीचा हिंसक मार्ग स्वीकारला जाईल असे गांधीजींचे मत होते. त्यामुळे समाजातील हे अनर्थ टाळायचे असतील तर विश्वस्त संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल कारण या संकल्पनेतून शांततामय मार्गाने समाजवादी समाज निर्माण होऊ शकतो असे गांधीजींना वाटत होते.

**४) मानवतावाद व नैतिकतेचे तत्व**

विश्वस्त संकल्पनेत गांधीजींनी उच्च दर्जाच्या नैतिक आचरणाला आणि मानवतावादी विचारांना महत्त्व दिले आहे. या संकल्पनेची मांडणी करताना गांधीची श्रमिकांना अहिंसा व्रत तर श्रीमंतांनी अपरिग्रह व्रत आचरावे असे सांगतात. विश्वस्त संकल्पना व्यावहारिक पातळीवर येण्यासाठी गरीब–श्रीमंत या दोघांचेही आचरण मानवतावादी व नैतिक मूल्यावर अधिष्ठित असले पाहिजे, असे गांधीजींचे मत असल्याचे दिसून येते.

**५) उत्तरदायित्वाच्या भावनेचे तत्व**

विश्वस्त संकल्पनेमध्ये गांधीजींनी तुमच्याकडे संपत्ती, शक्ती, बुद्धी जे काही जास्त असेल त्याचा उपयोग समाजासाठी करावा असे सांगितले आहे. त्यामुळे भांडवलवादी व्यवस्थेला सुद्धा समतेवर आधारित व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे शक्य होईल. प्रत्येक व्यक्ती समाजाप्रती व निसर्गाप्रती उत्तरदायी असला पाहिजे, निसर्गाकडून मिळणाऱ्या गोष्टीबाबत ही प्रत्येकाने आपल्या गरजेनुसार उत्तरदायित्वाच्या भावनेने वागले पाहिजे. एकंदरीत विश्वस्त संकल्पना माणसाची समाजाप्रतीव निसर्गाप्रती उत्तरदायित्वाची भावना वृद्धिंगत करणारी आहे.

Scanned with CamScanner

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 6.10 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH Issue : XXIII, Vol. I, Nov. 2021 To April 2022 

## ६) हृदय परिवर्तनाचे तत्व

विश्वस्त संकल्पना ही माणसाच्या सत्प्रवृत्तीवर अवलंबून आहे. आपल्याकडे असलेल्या संपत्तीचे अपरिग्रहवृत्तीने मालक नसून ती संपत्ती समाजाची आहे व त्या संपत्तीचा वापर समाजाच्या कल्याणासाठी करायचा आहे. ही भावना हृदय परिवर्तनझाल्याशिवाय आणि उच्च मानवतावादी मूल्याशिवाय येऊ शकत नाही,त्यामुळेही संकल्पना हृदय परिवर्तनावर आधारलेली आहे.

## ७) सामाजिक व कायदेशीर उपयोजनाचे तत्व

श्रीमंत वर्ग विश्वस्त भावनेने वागण्यास तयार होत नसेल तर अहिंसक व विधायक मार्गाचा अवलंब करून लोकांनी त्यांच्यावर दबाव आणावा, त्यासाठी प्रसंगी असहकार करावा असेही गांधीची सांगतात.त्याचबरोबर शासनानेही त्यांच्या पातळीवरून प्रयत्न करावेत नियमन करावे, जेणेकरून श्रीमंत लोक आपल्या संपत्तीचा विनियोग लोककल्याणासाठी करतील

## सारांश

महात्मा गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेचा अभ्यास करताना हे जाणवते की, त्यांची संकल्पना समाजामध्ये न्याय्यवातावरण निर्माण करण्यासाठी, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी, कारखानदार—कामगार, जमीनदार— शेतमजूर, श्रीमंत—गरीब, राव—रंक यांच्यातील असह्य विषमता कमी करण्यासाठी मांडलेली आहे. हिंसात्मक दबाव आणून उपयोग नाही त्यामुळे अहिंसक मार्गाने त्यांचे मनपरिवर्तन केले पाहिजे व त्यासाठी उद्योगपती व भांडवलदार केवळ शोषण करणारे मालक न राहता समाजाचे सेवक, विश्वस्त बनावेत, हा विचार गांधीजींचा होता. म्हणूनच त्यांचा हा विचार आदर्श स्वरूपाचा आहे. या संकल्पनेच्या अनुषंगाने काही मर्यादा ही सांगितल्या जातात, जसे ही संकल्पना आदर्शवादी आहे, वर्तमानकालीन स्वैर व स्पर्धात्मक भांडवलवादाच्या काळातही संकल्पना उपयुक्त नाही, प्रासंगिक नाही, या संकल्पनेमुळे नवोन्मेषी लोकांना प्रेरणा मिळणार नाहीत, भागधारकाकडून ही संकल्पना अस्वीकृत ठरेल, समाजवाद ही कालबाह्य संकल्पना आहे, अशा विविध पद्धतीने या संकल्पनेच्या मर्यादा सांगितल्या जातात. परंतु या सर्व मर्यादा मानवतावादाने नव्हे तर भांडवलवादाने प्रेरित असल्याचे दिसते, अपरिग्रह वृत्तीने नव्हे तर परिग्रह वृत्तीने प्रेरित आहेत. मुळात ही संकल्पना मानवतावादावर आणि उच्च मानवी मूल्यांवर आधारलेली आहे, उपभोगवादावर नाही तर उपयोगावर आधारलेली आहे, वर्गसंघर्ष ऐवजी वर्गसहकार यावर आधारलेली आहे. या संकल्पनेचे अंतरंग नीट कळल्याशिवाय तिची उपयुक्तता लक्षात येणार नाही. वर्तमानकालीन

Scanned with CamScanner

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 6.10
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XXIII, Vol. I, Nov. 2021 To April 2022 

भांडवलवादी व्यवस्थेने निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे आणि समस्यांचे समाधान या विश्वस्त संकल्पनेत महात्मा गांधींनी अंतर्भूत केलेले आहे, हे दिसून येते. म्हणून ही संकल्पना आजही प्रासंगिक ठरते.

## संदर्भ सूची :-

१) विनोबा,भूदान गंगा, भाग ५, परंधाम विद्यापीठ प्रकाशन, पवनार,१९५८
२) विनोबा, सर्वोदय विचार आणि स्वराज्यशास्त्र, परंधाम प्रकाशन पवनार,१९८९
३) साहित्य अमृत, गांधी विशेषांक,जानेवारी २०२०
४) मे. पु. रेगे (संपादक)मराठी विश्वकोश खंड १६, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९९९.

Scanned with CamScanner